## आजचे पंचांग

शनिवार, दि. १६ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, अमावास्या रात्री १-३१ पर्यंत नंतर प्रतिपदा तिथी, दिवस नक्षत्र– भरणी संध्याकाळी ५-३० पर्यंत नंतर कृत्तिका, चंद्र रास- मेष रात्री १०४७ पर्यंत नंतर वृषभ, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन



# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## एचएसआरपीला मुदवाढ

**पुणे:** राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट १ जुलै पासून सक्तीची करण्यात येणार असल्याची घोषणा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी केली. निर्धारित मुदतीत एचएसआरपी न बसविलेल्या वाहनधारकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करत एक हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाणार आहे. राज्य सरकारने जुन्या वाहनांच्या नंबर प्लेट बदलण्यासाठी ३० जून पर्यंत मुदत दिली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 — शनिवार, दि. १६ मे, २०२६ — वर्ष - १ अंक - २३० पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### नरेश म्हस्के यांना न्यायालयाचा दिलासा

**नवी दिल्ली** : ठाकरे गटाचे नेते आणि माजी खासदार राजन विचारे यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावत शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. नरेश म्हस्के यांनी प्रतिज्ञापत्रात गुन्ह्याची माहिती लपवली असल्याचा आरोप विचारे यांनी याचिकेद्वारे केला होता. तसेच नरेश म्हस्के यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

### आत्महत्येवरून सरकारवर निशाणा

**लखनौ** : उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी जिल्ह्यात 'नीट'च्या उमेदवाराच्या आत्महत्येवरून समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी शुक्रवारी केंद्रावर हल्ला चढवला आणि असा दावा केला की, पेपर फुटीच्या आरोपांमुळे वैद्यकीय प्रवेश परीक्षा रद्द झाल्यानंतर विद्यार्थी नैराश्यात आणि त्रासात सापडला आहे. यादव यांनी लखीमपूर खेरीमधील गंगोत्री नगरमधील रहिवासी आणि एनईईटीचे इच्छुक ऋतिक मिश्रा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती शोक व्यक्त केला.

### फरार गुन्हेगाराला नुहमध्ये अटक

**गुरुग्राम** : गेल्या १३ वर्षांपासून फरार असलेल्या एका गुन्हेगाराला नुह पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कसाम हा सौंख गावचा रहिवासी असून त्याला गुरुवारी टौरू सदर पोलिस ठाण्यातून अटक करण्यात आली. सध्या तो राजस्थानमधील टपुकारा पोलिस ठाण्याच्या अंतर्गत कुलावत येथे राहत होता. पोलिसांनी त्याला अटक केली.

## सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या वक्तव्यावरून खळबळ

# “बेरोजगार तरुण झुरळांसारखे...”

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या एका वक्तव्यामुळे न्यायवर्तुळात आणि सामाजिक माध्यमांवर मोठी चर्चा सुरू झाली आहे. एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान त्यांनी काही बेरोजगार तरुणांबाबत भाष्य करताना, “काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनतात आणि व्यवस्थेवर हल्ला करू लागतात,” असे म्हटल्याचे समोर आले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर एका वकिलाने ज्येष्ठ वकील दर्जासाठी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने संबंधित वकिलाच्या वर्तनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. “समाजात आधीच असे परजीवी आहेत जे व्यवस्थेवर हल्ला करतात,” असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

खंडपीठाने याचिकाकर्त्याला फटकारताना म्हटले की, “जगातील प्रत्येक व्यक्ती ज्येष्ठ वकील होण्यास पात्र असू शकते, पण तो तुमचा अधिकार नाही.” तसेच दिल्ली उच्च न्यायालयाने ज्येष्ठ वकील दर्जा दिला तरी सर्वोच्च न्यायालय वर्तनाच्या आधारे तो निर्णय रद्द करू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने याचिकाकर्त्याला विचारले की, त्याच्याविरोधात इतर खटले प्रलंबित नाहीत का आणि अशा प्रकारचे वर्तन ज्येष्ठ वकील बनण्यास इच्छुक व्यक्तीस शोभणारे आहे का? “ज्येष्ठ वकील दर्जा हा मिळवून घेण्याचा विषय नाही, तो दिला जातो,” असेही खंडपीठाने नमूद केले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने काही वकिलांच्या पदव्यांच्या सत्यतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “अनेक वकिलांच्या पदव्यांची सीबीआयमार्फत चौकशी करण्याचा विचार सर्वोच्च न्यायालय करू शकते,” असे निरीक्षण नोंदवत बार कौन्सिल ऑफ इंडियावरही अप्रत्यक्ष टीका करण्यात आली. सुनावणीच्या शेवटी संबंधित याचिकाकर्त्याने न्यायालयाची माफी मागितली आणि याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली. न्यायालयाने त्यास परवानगी दिली. याच पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी माजी न्यायाधीशांच्या भूमिकेवर भाष्य करताना न्यायव्यवस्थेवरील लोकांच्या विश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले होते. ‘राल्सा’ आयोजित परिषदेत बोलताना त्यांनी म्हटले होते की, “एखाद्या व्यक्तीकडे काहीही नसले तरी त्याच्याजवळ संविधान असते आणि हीच त्याच्या हक्कांची सर्वात मोठी ताकद आहे.”

राजस्थानातील पायऱ्यांच्या विहिरींचे उदाहरण देत त्यांनी माजी न्यायाधीशांना समाजाचा अमूल्य वारसा संबोधले होते. “संकटाच्या काळात जसे विहिरी लोकांची तहान भागवतात, तसेच अनुभवी माजी न्यायाधीश न्यायव्यवस्थेला मार्गदर्शन करतात,” असेही त्यांनी नमूद केले होते.

## नीट पेपरफुटीचा मास्टरमाईंड सीबीआयच्या ताब्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**लातूर** : ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणात मोठी घडामोड समोर आली असून या प्रकरणातील कथित मास्टरमाईंडला केंद्रीय अन्वेषण विभागाने ताब्यात घेतले आहे. पी. व्ही. कुलकर्णी असे याचे नाव असून त्याला लातूरमधून ताब्यात घेण्यात आले आहे. तो नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएशी संबंधित असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.

३ मे रोजी घेण्यात आलेल्या ‘नीट’ परीक्षेचा पेपर आधीच फुटल्याचे उघड झाल्यानंतर केंद्र सरकारने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. या प्रकरणात देशभरातून अनेक संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून आता तपासाला मोठे वळण मिळाले आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, पी. व्ही. कुलकर्णी हे पूर्वी पुण्यात रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. चार वर्षांपूर्वी ते सेवानिवृत्त झाल्याचे सांगितले जात आहे. त्यांनीच प्रश्नपत्रिका फुटविल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात पुण्यातील ब्युटी पार्लर चालक मनीषा वाघमारे हिच्याशी कुलकर्णी यांचा संपर्क असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. याच धाग्यावरून सीबीआयचे पथक लातूरपर्यंत पोहोचले. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या चौकशीनंतर कुलकर्णी यांना ताब्यात घेण्यात आले. लातूरमधील कैलासनगर परिसरातील कुलकर्णी यांच्या घराला सध्या कुलूप असून त्यांचे कुटुंब पुण्यात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली आहे.

## आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा राज्यात धडाका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्य सरकारने पोलीस प्रशासनात मोठे फेरबदल करत २४ वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून पोलीस दलातील बदल्यांची मालिका सुरूच असून, या निर्णयामुळे पोलीस प्रशासनात व्यापक हालचाली घडल्या आहेत.

या बदल्यांमध्ये अतिरिक्त पोलिस महासंचालक, पोलिस महानिरीक्षक, सह पोलिस आयुक्त तसेच अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. राज्यातील कायदा-सुव्यवस्था आणि प्रशासकीय कार्यक्षमतेच्या दृष्टीने या बदल्या महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. नाशिकचे वादग्रस्त पोलिस महानिरीक्षक दत्ता कराळे यांचीही बदली करण्यात आली आहे. त्यांच्या कार्यपद्धतीवरून मागील काही महिन्यांपासून विविध स्तरांवर चर्चा सुरू होती. वरिष्ठ आयपीएस अधिकारी ज्योतिप्रिया सिंह यांची अँटीनार्कोटिक्स विभागाच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, मंत्री मेघना बोर्डीकर यांचे पती आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी दिपक साकोरे यांना बढती देत नवी मुंबईच्या सह पोलीस आयुक्तपदी नियुक्त करण्यात आले आहे.

राज्य सरकारकडून गेल्या काही महिन्यांत पोलीस प्रशासनात सातत्याने मोठ्या प्रमाणावर बदल्या केल्या जात असून, त्यामागे प्रशासन अधिक गतिमान आणि परिणामकारक करण्याचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

## गंगाजळी ६९६.९८८ अब्ज डॉलरवर; सोन्याच्या साठ्यातही वाढ

# भारताच्या परकीय चलन साठ्यात मोठी वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : पंतप्रधान मोदी यांनी बचतीचे केलेले आवाहन हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या मंदीचे लक्षण नसून, अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आहे, हे भारताच्या विदेशी गंगाजळीच्या जाहीर झालेल्या आकडेवारीतून समोर आले आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ८ मे रोजी संपलेल्या आठवड्यात भारताच्या परकीय चलन साठ्यात ६.२९५ अब्ज डॉलरची वाढ झाली असून, देशाची गंगाजळी ६९६.९८८ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. मागील आठवड्यात हा साठा ७.७९४ अब्ज डॉलरने घसरून ६९०.६९३ अब्ज डॉलरवर आला होता. पश्चिम आशियातील तणाव सुरू होण्यापूर्वी, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय चलन साठा ७२८.४९४ अब्ज डॉलरच्या सार्वकालिक उच्चांकावर पोहोचला होता. मात्र त्यानंतर जागतिक अस्थिरता, कच्च्या तेलाच्या किंमतीतील वाढ आणि रुपयावरील दबावामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला डॉलर विक्रीद्वारे चलन बाजारात हस्तक्षेप करावा लागला होता.

ताज्या आकडेवारीनुसार, परकीय चलन मालमत्तेमध्ये ५६२ दशलक्ष डॉलरची वाढ झाली असून ती ५५२.३८७ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. डॉलरच्या तुलनेत व्यक्त केल्या जाणाऱ्या या मालमत्तेमध्ये युरो, पौंड आणि येनसारख्या इतर प्रमुख चलनांच्या मूल्यातील चढ-उतारांचाही समावेश असतो.

दरम्यान, सोन्याच्या साठ्याच्या मूल्यात मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. या आठवड्यात सोन्याचा साठा ५.६३७ अब्ज डॉलरने वाढून १२०.८५३ अब्ज डॉलरवर पोहोचला आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडील विशेष ड्रॉइंग हक्क (एसडीआर) ८४ दशलक्ष डॉलरने वाढून १८.८७३ अब्ज डॉलरवर पोहोचले आहेत. जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या काळात भारताचा मजबूत परकीय चलन साठा हा देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचा आधार मानला जात आहे.

## इंधन बचतीसाठी सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

# आठवड्यातील दोन दिवस ऑनलाइन सुनावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालय यांनी पश्चिम आशियातील वाढत्या भू-राजकीय तणाव आणि इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर इंधन बचतीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. आठवड्यातील दोन दिवस नवीन प्रकरणांची सुनावणी पूर्णपणे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला असून, न्यायालयीन नोंदणी विभागातील ५० टक्के कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभाही देण्यात आली आहे.

हा निर्णय भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या फुल कोर्ट बैठकीत घेण्यात आला. इंधन बचतीची राष्ट्रीय गरज लक्षात घेऊन या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

नवीन निर्देशांनुसार, सोमवार आणि शुक्रवार या दिवशी होणाऱ्या नवीन प्रकरणांच्या सुनावण्या पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने पार पडतील. आवश्यकतेनुसार इतर दिवशीही व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी घेता येणार आहे. कोविड काळात विकसित झालेल्या डिजिटल न्यायप्रणालीचा अधिक प्रभावी वापर करण्याचा न्यायालयाचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे महासचिव भरत पराशर यांनी जारी केलेल्या परिपत्रकात रजिस्ट्री विभागातील ५० टक्के कर्मचाऱ्यांना आठवड्यात दोन दिवस घरून काम करण्यास परवानगी देण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यासाठी संबंधित रजिस्ट्रारांना साप्ताहिक रोस्टर तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

घरून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामकाजाच्या वेळेत सतत फोनवर उपलब्ध राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. तातडीच्या परिस्थितीत त्यांना त्वरित कार्यालयात हजर राहावे लागू शकते. तसेच एखाद्या महत्त्वाच्या कामात अडथळा निर्माण होत असल्यास संबंधित रजिस्ट्रारांना ही व्यवस्था बदलण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

इंधन बचतीच्या व्यापक उद्देशातून न्यायमूर्तींनीही कार पूलिंगचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय व्हिडीओ कॉन्फरन्सिंग व्यवस्था अधिक सक्षम आणि सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक तांत्रिक मदत वेळेवर उपलब्ध करून देण्याचे आदेश न्यायालयीन प्रशासनाला देण्यात आले आहेत.

## महसूल विभागाचे सर्व निकाल मराठीत

**मुंबई** : राज्यभरातील महसूल अधिकारी आणि प्राधिकरणांकडे दाखल होणारी अर्धन्यायिक प्रकरणे अधिक वेगाने आणि पारदर्शक पद्धतीने निकाली काढण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नवीन ‘मानक कार्यपद्धती’ (एसओपी) लागू केली आहे. यासंदर्भातील २९ पानी शासन आदेश शुक्रवारी जारी करण्यात आला. या नव्या कार्यपद्धतीनुसार महसूल विभागातील सर्व अर्धन्यायिक कामकाजात मराठी भाषेचा वापर बंधनकारक करण्यात आला असून, सर्व निकालपत्रेही मराठीतून देणे अनिवार्य करण्यात आले आहे.

## लाडक्या बहिणींच्या खात्यात ३ हजार जमा

### मार्च आणि एप्रिल महिन्याचे हप्ते खात्यात जमा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्र शासन यांच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात मार्च आणि एप्रिल महिन्याचे हप्ते जमा होण्यास सुरुवात झाली आहे. १४ मे रोजी मार्च महिन्याचे १५०० रुपये जमा झाल्यानंतर गुरुवारी अनेक लाभार्थी महिलांच्या खात्यात एप्रिल महिन्याचे आणखी १५०० रुपये जमा झाल्याचे संदेश प्राप्त झाले आहेत. त्यामुळे दोन दिवसांत एकूण ३ हजार रुपये महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत.

राज्यातील कोट्यवधी लाभार्थी महिला गेल्या काही दिवसांपासून मार्च आणि एप्रिल महिन्याच्या हप्त्यांची प्रतीक्षा करत होत्या. यापूर्वी फेब्रुवारी महिन्याचा हप्ता २४ मार्च रोजी वितरित करण्यात आला होता. त्यानंतर दोन महिन्यांचा निधी रखडल्याने महिलांमध्ये नाराजी होती. राज्य सरकारकडून १४ आणि १५ मे रोजी अनुक्रमे मार्च आणि एप्रिल महिन्यांचे हप्ते वितरित करण्यात आल्याने लाभार्थींना मोठा दिलासा मिळाला आहे.

महायुती सरकारने लोकसभा निवडणुकीनंतर जुलै २०२४ मध्ये ही योजना सुरू केली होती. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. सुरुवातीपासूनच या योजनेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता.

योजनेचा लाभ केवळ पात्र महिलांनाच मिळावा यासाठी सरकारने ई-केवायसी प्रक्रिया सक्तीची केली होती.

ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान अनेक महिलांनी शासकीय नोकरीसंदर्भातील माहिती चुकीची भरल्याचे निदर्शनास आले होते. त्यासाठी शासनाने ३० एप्रिलपर्यंत दुरुस्तीची संधी दिली होती. मात्र, वारंवार मुदतवाढ देऊनही अनेक महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही.

## होर्मुझ सामुद्रधुनीत सर्व जहाजांच्या सुरक्षित प्रवासाची इराणची ग्वाही

# लष्करी कारवाई हा अंतिम पर्याय असू शकत नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : अब्बास अराघची यांनी इराणशी संबंधित कोणत्याही समस्येवर लष्करी कारवाई हा अंतिम पर्याय असू शकत नाही, असे स्पष्ट प्रतिपादन केले आहे. भारत दौऱ्यावर असताना नवी दिल्ली येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावपूर्ण परिस्थिती, अणु कार्यक्रम, भारताची भूमिका आणि अमेरिकेसोबतचे संबंध यावर सविस्तर भाष्य केले.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाढत्या तणावाबाबत बोलताना अराघची म्हणाले की, “आम्ही या सामुद्रधुनीतून सर्व व्यापारी जहाजांचा सुरक्षित प्रवास सुनिश्चित करण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहोत.” सध्याची परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची असल्याचे सांगत त्यांनी संवाद आणि मुत्सद्देगिरीलाच एकमेव मार्ग असल्याचे अधोरेखित केले. इराणने कधीही अण्वस्त्रांची आकांक्षा बाळगलेली नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी म्हटले की, “युद्ध आणि संघर्षाऐवजी चर्चेच्या माध्यमातूनच प्रश्न सोडवले जावेत.” पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी चीनकडून उचलल्या जाणाऱ्या कोणत्याही सकारात्मक पावलांचे इराण स्वागत करेल, असेही त्यांनी नमूद केले.

भारताच्या संभाव्य मध्यस्थीबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना अब्बास अराघची यांनी भारताच्या भूमिकेचे स्वागत केले. “या संकटकाळात भारत कोणतीही विधायक भूमिका बजावणार असेल, तर इराण त्याचे मनापासून स्वागत करेल,” असे ते म्हणाले. भारत आणि इराण यांच्यातील ऐतिहासिक व धोरणात्मक संबंध लक्षात घेता शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी अमेरिका आणि पाकिस्तानविषयीही भूमिका मांडली. पाकिस्तानच्या मध्यस्थी प्रयत्नांबाबत बोलताना त्यांनी ते अद्याप अपयशी ठरलेले नसल्याचे सांगितले. अमेरिकेबाबत मात्र त्यांनी अविश्वास व्यक्त करत, “इराणकडे अमेरिकेवर अविश्वास दाखवण्यासाठी पुरेशी कारणे आहेत. आता अमेरिकेने इराणचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे,” असे सूचक विधान केले. पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणकडून आलेले हे विधान महत्त्वाचे मानले जात असून, जागतिक स्तरावर शांतता आणि संवादाच्या प्रयत्नांना त्यातून नवे संकेत मिळत असल्याचे मानले जात आहे.

## विमान प्रवाशांना मोठा दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक क्षेत्रावर दबाव वाढत असतानाच, महाराष्ट्र सरकार ने विमान प्रवासी आणि विमान कंपन्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. विमान इंधनावरील (एटीएफ) मूल्यवर्धित कर (व्हॅट) १८ टक्क्यांवरून थेट ७ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून, शुक्रवार १५ मेपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

जागतिक तणावामुळे विमान इंधनाच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली असून, त्याचा थेट परिणाम विमान भाड्यावर होऊ शकतो. ही संभाव्य भाडेवाढ रोखण्यासाठी राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करत कर कपातीचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

सध्या पश्चिम आशियातील संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय हवाई मार्गांवर निर्बंध, उड्डाणांमध्ये अनिश्चितता आणि इंधन दरवाढ यामुळे विमान कंपन्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनेही विमान कंपन्यांना विविध सवलती जाहीर केल्या आहेत. मात्र राज्यांकडून आकारला जाणारा व्हॅट हा कंपन्यांसाठी मोठा खर्च ठरत होता.

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने इंधनावरील व्हॅट कमी करण्यासाठी राज्यांशी चर्चा सुरू केली होती. त्याला त्वरित प्रतिसाद देत महाराष्ट्राने घेतलेल्या निर्णयाबद्दल केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे विशेष आभार मानले आहेत.

## संपादकीय

# जागतिक संकट आणि इंधनाचे वास्तव!




**पेट्रोल आणि डिझेलच्या दरात झालेली तीन रुपयांची वाढ ही वरवर पाहता सर्वसामान्यांसाठी चिंतेचा विषय वाटत असली, तरी गेल्या चार वर्षांतील जागतिक उलथापालथ आणि केंद्र सरकारने अर्थव्यवस्थेला दिलेले भक्कम संरक्षण लक्षात घेता, या निर्णयामागील अपरिहार्यता आणि 'राष्ट्रहित' समजून घेणे अधिक गरजेचे आहे.**

इंधनाच्या दरात थोडी जरी वाढ झाली की, देशात लगेचच राजकीय कोल्हेकुई सुरू करण्याची विरोधकांची जुनीच सवय आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात नुकतीच झालेली प्रतिलिटर तीन रुपयांची वाढ ही देखील याच राजकीय 'नरेटिव्ह'चा भाग बनवली जात आहे. मात्र, या दरवाढीकडे पाहताना केवळ आजचा आणि तांत्रिक विचार करून चालणार नाही. गेल्या चार वर्षांत जागतिक पातळीवर जी अभूतपूर्व संकटे आली आणि त्या महाभयंकर संकटांच्या काळात मोदी सरकारने आपल्या सामान्य नागरिकांना महागाईच्या झळांपासून कसे सुरक्षित ठेवले, याचा प्रामाणिक ताळेबंद मांडला, तर या तीन रुपयांच्या वाढीचे खरे अर्थकारण आणि त्यामागील वास्तव स्पष्ट होईल. गेल्या चार वर्षांतील जागतिक घडामोडींवर नजर टाकली, तर जगासाठी हा काळ अत्यंत खडतर आणि अराजकतेचा होता हे मान्यच करावे लागेल. अमेरिका आणि युरोपसारख्या प्रगत आणि बलाढ्य अर्थव्यवस्था महागाईच्या आगीत अक्षरशः होरपळून निघाल्या. युक्रेन युद्ध सुरू झाल्यावर कच्च्या तेलाचे भाव प्रति बॅरल १२५ डॉलर्सच्या पुढे गेले. अमेरिकेत इंधनाचे दर गगनाला भिडले, ज्याचा फटका तिथे बायडेन प्रशासनाला आजही बसत आहे. युरोपला तर हिवाळ्यात ऊर्जेचे रेशनिंग करावे लागले. प्रगत देशांमधील नागरिक इंधन आणि गॅससाठी रस्त्यावर उतरल्याचे चित्र जगाने पाहिले. पण याच चार वर्षांत भारतात काय परिस्थिती होती? भारत हा आपल्या गरजेच्या ८५ टक्क्यांहून अधिक कच्चे तेल आयात करणारा देश आहे. अशा परिस्थितीत, जिथे जगातील प्रगत अर्थव्यवस्था कोसळत होत्या, तिथे भारतात इंधनाचे दर तब्बल चार वर्षे स्थिर राहिले. जेव्हा पाश्चिमात्य देशांनी रशियावर निर्बंध लादले, तेव्हा भारताने अमेरिकेच्या दबावाला यत्किंचितही भीक न घालता, रशियाकडून सवलतीच्या दरात तेल आयात करण्याचा निर्णय घेतला. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी जागतिक मंचावर अतिशय रोखठोकपणे भारताची भूमिका मांडताना स्पष्ट केले की, "आमचे पहिले प्राधान्य आमच्या देशातील जनतेला रास्त दरात ऊर्जा पुरवणे हे आहे." जग महागाईने होरपळत होते, तेव्हा भारतीय नागरिक मात्र स्थिर दरामुळे निश्चिंत होता. मग आताच ही दरवाढ का करावी लागली? याचे उत्तर बदललेल्या जागतिक समीकरणांत दडलेले आहे. रशियाकडून मिळणारी तेलाची सवलत आता जागतिक परिस्थितीमुळे बऱ्याच अंशी कमी झाली आहे. त्यातच इस्रायल-हमास आणि इराणच्या संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या वाहतुकीचा मार्ग बदलावा लागला असून, वाहतुकीचा खर्च आणि जहाजांच्या विम्याचे हप्ते प्रचंड वाढले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत पुन्हा एकदा उसळी आली आहे. आपल्या सरकारी तेल कंपन्यांनी नफ्या-तोट्याची पर्वा न करता देशाची अर्थव्यवस्था सावरण्यात मोठे योगदान दिले. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल महाग असतानाही त्यांनी प्रचंड तोटा सहन करून देशांतर्गत दर वाढू दिले नाहीत. आता जागतिक तणाव अधिकच वाढलेला असताना, या कंपन्यांनाही तग धरण्यासाठी आणि देशाची ऊर्जा सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी या किरकोळ दरवाढीची गरज होती. आज जगातील अनेक देश मंदीच्या छायेत असताना, भारत मात्र जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून दिमाखात उभा आहे. हे केवळ आणि केवळ कोरोना काळ आणि युद्धकाळात इंधनाचे आणि अर्थव्यवस्थेचे योग्य व्यवस्थापन केल्यामुळेच शक्य झाले आहे. जर सरकारने तेव्हा हे कठोर आणि धाडसी निर्णय घेतले नसते, तर आज भारताची अवस्था आपल्या शेजारील राष्ट्रांसारखी झाली असती. सलग चार वर्षे जागतिक संकटांचे सर्व आघात स्वतःच्या अंगावर झेलून, जनतेला सुरक्षित ठेवणाऱ्या सरकारने आता जागतिक पुरवठा साखळीतील अपरिहार्य तणावामुळे तीन रुपयांची वाढ केली असेल, तर ती जागतिक संकटांच्या तुलनेत अत्यंत संयमित आहे. विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी आणि भविष्यातील मोठ्या आर्थिक धक्क्यांपासून देशाला वाचवण्यासाठी अशा प्रकारचे काही कठोर परंतु आवश्यक निर्णय घ्यावेच लागतात. विरोधकांच्या खोट्या नरेटिव्हला आणि अपप्रचाराला बळी न पडता, या निर्णयामागील जागतिक वास्तव आणि 'राष्ट्रहित' समजून घेणे हीच काळाची गरज आहे.

# पोखरलेल्या परीक्षा यंत्रणेने गुणवत्तेचा लिलाव

**» नीट परीक्षेच्या गोंधळाने देशातील वैद्यकीय शिक्षणाची विश्वासार्हता धुळीला मिळवली असून या संपूर्ण प्रक्रियेतील त्रुटी सीबीआय तपासातून उघड होत आहेत. हा तांत्रिक बिघाड नसून व्यवस्थेचे नैतिक अध:पतन ठरले आहे.**




देशातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेचा डोलारा ज्या प्रकारे कोसळला आहे तो पाहता आपली परीक्षा यंत्रणा किती पोखरलेली आहे याचे विदारक दर्शन घडते. नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीए या संस्थेकडे जेव्हा या परीक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली होती तेव्हा पारदर्शकता आणि अचूकता ही तिची कवचकुंडले असतील असे भासवण्यात आले होते. मात्र आता सीबीआयने ज्या प्रकारे या प्रकरणाचा तागा धरला आहे त्यातून समोर येणारी माहिती कोणत्याही सुजाण नागरिकाला अस्वस्थ करणारी आहे.

प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या त्या गोपनीय खोलीपासून ते प्रत्यक्ष परीक्षा केंद्रापर्यंतचा हा प्रवास म्हणजे भ्रष्टाचाराच्या साखळीचा एक न संपणारा गुंता असल्याचे आता दिसून येत आहे. या प्रक्रियेत केवळ विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागलेले नाही तर देशाच्या आरोग्य व्यवस्थेचा पायाच कमकुवत करण्याचा हा प्रयत्न आहे असे म्हणावे लागते.

सीबीआयच्या तपासाचा रोख आता त्या मुख्य स्त्रोताकडे आहे जिथून ही गळती सुरू झाली. प्रश्नपत्रिका छापली जाते त्या मुद्रणालयापासून ते तिची वाहतूक करणाऱ्या यंत्रणेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर संशयाची सुई फिरत आहे. प्रश्नपत्रिका फुटणे ही बाब आता आपल्याकडे इतकी नित्याची झाली आहे की त्याचे कोणाला आश्चर्य वाटेनासे झाले आहे. परंतु जेव्हा प्रश्न सर्वोच्च वैद्यकीय शिक्षणाचा असतो तेव्हा त्याचे परिणाम अधिक गंभीर असतात. ज्यांच्याकडे उद्या देशातील रुग्णांचे प्राण वाचवण्याची जबाबदारी असेल त्यांची निवडच जर अशा भ्रष्ट मार्गाने होणार असेल तर आपण कोणत्या प्रकारच्या गुणवत्तेचा गौरव करत आहोत हा प्रश्न उरतोच.

या संपूर्ण प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे शिक्षण क्षेत्रातील माफियांची पकड. बिहारपासून गुजरातपर्यंत पसरलेली ही साखळी केवळ योगायोग असू शकत नाही. हे एक नियोजनबद्ध अर्थकारण असून त्यात मोठे मासे सामील असण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यांनी लाखो रुपये मोजून या प्रश्नपत्रिका विकत घेतल्या त्या पालकांची मानसिकता ही या गुन्ह्यात तितकीच जबाबदार आहे. सीबीआय आता त्या कागदपत्रांच्या मागावर आहे जे प्रश्नपत्रिकेचा प्रवास अधोरेखित करतात. हा प्रवास केवळ भौगोलिक नसून तो नैतिक अध:पतनाचा प्रवास आहे.

एनटीए सारख्या संस्थांची स्वायत्तता आणि त्यांची कार्यक्षमता आता वादाच्या भोवऱ्यात आहे. इतकी मोठी परीक्षा घेताना ज्या प्रकारची सुरक्षा व्यवस्था आणि तांत्रिक दक्षता अपेक्षित असते ती का राखली गेली नाही याचे उत्तर संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेच लागेल. केवळ काही केंद्रांवर गडबड झाली असे म्हणून या प्रश्नाची तीव्रता कमी करता येणार नाही. लाखो विद्यार्थी जेव्हा रात्रंदिवस अभ्यास करून या परीक्षेला सामोरे जातात तेव्हा त्यांच्या विश्वासाचा हा असा लिलाव होणे हे लोकशाहीसाठी लज्जास्पद आहे. सीबीआयच्या तपासातून केवळ काही गुन्हेगार पकडले जातीलही पण मूळ प्रश्न हा आहे की आपण ही यंत्रणा पुन्हा कधी शुचिर्भूत करणार आहोत? प्रश्नपत्रिका फुटण्यापासून रोखण्यासाठी जे तंत्रज्ञान आपण वापरतो ते जर भेद्य असेल तर मग या परीक्षा घेण्याचा फार्स कशासाठी असा सवाल आता पालकांमधून उपस्थित केला जात आहे.

आजची शिक्षण व्यवस्था ही केवळ पदव्या वाटणारी यंत्रणा बनली असून त्यात मूल्यांना स्थान उरलेले नाही. शिक्षणाचे बाजारीकरण झाल्यामुळे ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांना गुणवत्तेची पायरी चढणे सोपे झाले आहे. परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकार रोखण्यासाठी आणि प्रश्नपत्रिकेच्या गोपनीयतेसाठी अधिक कठोर कायदे आणि पारदर्शक तंत्रज्ञान हवे. जोपर्यंत अशा गैरप्रकारांमध्ये सामील असलेल्यांना कठोर शिक्षा होत नाही तोपर्यंत हे चक्र थांबणार नाही.

गुणवत्ता ही केवळ पुस्तकी ज्ञानात नसते तर ती प्रक्रियेच्या शुद्धतेत असते. जर प्रवेशाची दारेच मलिदा खाऊन उघडली जाणार असतील तर त्यातून बाहेर पडणारे डॉक्टर समाजाचे कोणते भले करणार आहेत?

तुमची बुद्धी आणि तुमचे कौशल्य हेच तुमचे खरे भांडवल असले पाहिजे. जेव्हा या भांडवलावरच घाला घातला जातो तेव्हा समाज म्हणून आपण सर्वच पराभूत होतो. नीट परीक्षेचा हा गोंधळ आपल्या सर्वांसाठी एक धोक्याची घंटा आहे. सीबीआयचा तपास हा संपूर्ण व्यवस्थेचा एक्सरे असावा ज्यातून सर्व दोष स्पष्टपणे दिसतील. त्या दोषांवर वेळीच उपाय केला तरच उद्याच्या पिढीचा या व्यवस्थेवर विश्वास उरेल. नाहीतर ही आकड्यांची आणि तारखांची एक निरर्थक कसरत ठरेल, ज्याला आपण शिक्षण म्हणतो. ही वेळ आत्मचिंतनाची असून व्यवस्थेच्या शुद्धीकरणाची आहे. सत्याचा शोध घेणे हे आता तांत्रिक काम उरलेले नसून ते नैतिक कर्तव्य बनले आहे.

# पवना धरण परिसरातील अवैध उत्खननाविरोधात संताप

## मुरूम माफिया आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** मावळ तालुक्यातील पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या कथित अवैध मुरूम उत्खननाविरोधात शिवशाही व्यापारी संघाने आक्रमक भूमिका घेतली आहे. रात्रीच्या वेळी ५० हून अधिक हायवा डंपरद्वारे मुरूम आणि मातीची चोरी होत असल्याचा आरोप करत संबंधित मुरूम माफिया आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले यांनी केली आहे.



युवराज दाखले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना तातडीने हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे. "पवना धरण ही लाखो नागरिकांची जीवनवाहिनी आहे. मात्र, धरणाच्या काठावर जेसीबी आणि पोकलेनच्या साहाय्याने २० ते ३० फूट खोल खड्डे खणून मोठ्या प्रमाणावर मुरूम चोरी केली जात आहे," असा गंभीर आरोप त्यांनी केला. गेव्हाण खडक, चांदेवाडी, ठाकूरसाई, ब्राह्मोली, कोथुर्णे आणि शिवली मार्गे चांदखेडकडे विना नंबर प्लेटचे हायवा ट्रक मुरूम वाहतूक करत असल्याचा दावा त्यांनी केला. "स्थानिक महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन शक्य नाही," असेही दाखले म्हणाले.

या अवैध उत्खननामुळे पवना धरणाच्या सुरक्षिततेवर परिणाम होत असल्याचा इशाराही त्यांनी दिला. धरणाची साठवण क्षमता कमी होण्यासोबतच भूजल पातळी खालावत असून शेतकऱ्यांवर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, पर्यावरणाचा ऱ्हास होत असून १९६६ चा महसूल कायदा आणि १९८६ चा पर्यावरण संरक्षण कायदा पायदळी तुडवला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनींचेही मोठे नुकसान होत असल्याचे सांगत दाखले यांनी शासनाकडे काही प्रमुख मागण्या केल्या आहेत. यामध्ये पवना धरण परिसरात २४ तास विशेष भरारी पथकाची गस्त, मुरूम माफियांवर मोक्का अंतर्गत गुन्हे, धरण परिसरातील पाच किलोमीटर क्षेत्र 'नो मायनिंग झोन' घोषित करणे, ड्रोन सर्व्हे करून दंडात्मक कारवाई, जिल्हाधिकाऱ्यांकडून सात दिवसांत अहवाल मागवणे आणि सर्व हायवा डंपर जप्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

"सात दिवसांत ठोस कारवाई झाली नाही, तर शिवशाही व्यापारी संघ आणि शेतकरी मंत्रालयासमोर ठिय्या आंदोलन करतील. मुरूम माफियांना मावळातून हद्दपार केल्याशिवाय शांत बसणार नाही," असा इशाराही युवराज दाखले यांनी दिला.

# पावसाळ्यासाठी 'आपदा मित्र' स्वयंसेवकांची नियुक्ती

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** महानगरपालिकेच्या विधी समिती सभेत पावसाळा कालावधीत आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षित "आपदा मित्र" स्वयंसेवकांची प्रायोगिक तत्त्वावर नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. विधी समिती सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात झालेल्या बैठकीस समिती सदस्य ज्ञानेश्वर जगताप, विनायक गायकवाड, कुंदा भिसे, श्रुती डोळस, कुशाग्र कदम, शेखर चिंचवडे, वर्षा जगताप आणि तुषार सहाणे उपस्थित होते. तसेच नगरसचिव मुकेश कोळप, उपआयुक्त संदीप खोत, राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, कार्यकारी अभियंता शिरीष पोरेड्डी, विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल आदी यावेळी उपस्थित होते. आपत्ती व्यवस्थापन विभागाचे काम अधिक परिणामकारक, गतिमान आणि सक्षम करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. संभाव्य पूरस्थिती, झाडे पडणे, दुर्घटना आणि आपत्कालीन परिस्थितींना प्रतिसाद देण्यासाठी ही यंत्रणा कार्यरत राहणार आहे.

# घरयादी आणि घरगणना मोहिमेला आजपासून सुरुवात

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** जनगणना २०२७च्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात घरयादी आणि घरगणनेच्या पहिल्या टप्प्याला १६ मेपासून अधिकृत सुरुवात होणार आहे. ही मोहीम १४ जून २०२६ पर्यंत राबविण्यात येणार असून, या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन आवश्यक माहिती संकलित करणार आहेत.




महापालिका प्रशासनाने नागरिकांना या प्रक्रियेस पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. प्रगणक घरभेटीदरम्यान विचारण्यात येणारी माहिती अचूक आणि प्रामाणिकपणे देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

घरयादी आणि घरगणना ही जनगणनेतील अत्यंत महत्त्वाची प्राथमिक प्रक्रिया मानली जाते. यामध्ये घरांची संख्या, रहिवाशांची माहिती तसेच मूलभूत सुविधांची नोंद केली जाणार आहे. या माहितीच्या आधारे शासन विविध विकास योजना, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक कल्याणविषयक धोरणे आखत असते. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे उपआयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले की, नागरिकांकडून संकलित करण्यात येणारी सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार आहे. "प्रगणकांकडून विचारली जाणारी माहिती केवळ शासकीय नियोजन आणि विकासकामांसाठी वापरली जाईल. नागरिकांच्या वैयक्तिक माहितीची सुरक्षितता ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. त्यामुळे कोणतीही भीती किंवा शंका न बाळगता नागरिकांनी अचूक माहिती देऊन या प्रक्रियेत सहभागी व्हावे," असे पवार यांनी म्हटले. महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले आहे.

"देशाच्या विकासासाठी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती अत्यंत आवश्यक आहे. जनगणना ही केवळ आकडेवारी संकलनाची प्रक्रिया नसून भविष्यातील विकास आराखड्याचा पाया आहे. प्रत्येक नागरिकाचा जबाबदारीपूर्ण सहभाग देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वाचा ठरेल," असे त्यांनी नमूद केले. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनीही घरयादी आणि घरगणना मोहिमेला सक्रिय प्रतिसाद देण्याचे आवाहन केले.

# महापालिकेत नोकरीचे आमिषाने १६ लाखांची फसवणूक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत तब्बल १६ लाख १८ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत किरण कृष्णात ठोंबरे (वय ४४, रा. प्रेमदीप बिल्डिंग, उद्यमनगर, पिंपरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार आशिष अशोक उबाळे (वय अंदाजे ३८, रा. गणेश गार्डनजवळ, दापोडी, पुणे) याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२) आणि ३१८(४) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०२४ ते २५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत आरोपीने स्वतःची ओळख पुणे महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा प्रशासकीय सचिव म्हणून करून दिली. महापालिकेत अनुकंपा तत्त्वावर सहा रिक्त जागा असून संबंधित उमेदवारांना क्लार्क आणि शिपाई पदावर नोकरी मिळवून देतो, असे सांगून त्याने फिर्यादी आणि त्यांच्या नातेवाईकांचा विश्वास संपादन केला. यानंतर आरोपीने विविध उमेदवारांकडून नोकरी लावून देण्याच्या नावाखाली एकूण १६ लाख १८ हजार ५०० रुपये उकळल्याचा आरोप आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणालाही नोकरी न देता आरोपीने फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आटवे करीत आहेत.

### ज्येष्ठ नागरिकाची सायबर फसवणूक

**पिंपरी :** निगडी परिसरातील ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची मोबाईल ॲप डाउनलोड करण्यास भाग पाडून तब्बल ४ लाख ९९ हजार ७७४ रुपयांची सायबर फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदानंद सदाशिव गोक्हले (वय ७७, रा. नंदादीपश्री हाउसिंग सोसायटी, सेक्टर २६, निगडी प्राधिकरण) यांना ८ ते ९ मे २०२६ दरम्यान अज्ञात व्यक्तीने व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधला. आरोपीने ८१०१५८०१९२ या क्रमांकावरून एपीके फाइल पाठवून ती मोबाईलमध्ये डाउनलोड करण्यास सांगितले. फिर्यादी यांनी संबंधित फाइल डाउनलोड करताच आरोपीने त्यांच्या मोबाईलचा ॲक्सेस मिळवला. त्यानंतर आरोपीने फिर्यादी यांच्या आयसीआयसीआय बँकेच्या डेबिट कार्डचा वापर करून विविध ऑनलाइन व्यवहार केले आणि ४ लाख ९९ हजार ७७४ रुपये परस्पर काढून घेतल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ मधील कलम ६६(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक फटांगरे करीत आहेत.

### गांजा विक्रीप्रकरणी कारवाई

**पिंपरी :** पेरूची बाग परिसरात अमली पदार्थविरोधी पथकाने कारवाई करत ३३० ग्रॅम गांजासह एका आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणी मुख्य पुरवठादाराचा शोध सुरू असून भोसरी एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.


भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४७/२०२६ नोंद करण्यात आला असून, एनडीपीएस कायद्याच्या अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई १३ मे रोजी दुपारी सुमारे २.२० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपक वसंत जाधव (वय ४५, रा. बो-हाडे वस्ती, मोशी, पुणे) याच्याकडून १६ हजार ५०० रुपये किमतीचा ३३० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. आरोपीने हा गांजा पेरूची बाग परिसरातील दुर्गा पवार याच्याकडून विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात दीपक जाधव याला अटक करण्यात आली असून, मुख्य पुरवठादार असलेल्या दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

# बावधनमध्ये तरुणावर लोखंडी हत्याराने हल्ला

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** बावधन परिसरात जुन्या वादातून १८ वर्षीय तरुणावर लोखंडी हत्याराने हल्ला करून मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना १२ मे २०२६ रोजी रात्री ग्रामपंचायत कार्यालयासमोरील कट्ट्यावर घडली. फिर्यादी आर्यन अंकुश पिसाळे (वय १८) हे मित्रांसोबत तेथे बसले असताना आरोपी सोनू लाटे, विकी लाटे आणि अतुल माने (सर्व रा. बावधन) यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली.




तक्रारीनुसार, आरोपी विकी लाटे याने लोखंडी हत्याराने आर्यन पिसाळे यांच्या हातावर वार केला. त्यानंतर इतर आरोपींनी लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यांना जखमी केले. तसेच, "पुन्हा भेटलास तर मारून टाकू," अशी धमकी दिल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### गुटख्यावर पोलिसांची धडक कारवाई

**लोणी काळभोर :** पुणे जिल्ह्यात गुटखा बंदी केवळ कागदावरच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले असून, लोणी काळभोर परिसरात पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत तब्बल पाच लाखांहून अधिक किमतीचा प्रतिबंधित गुटखा, पान मसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण साठा एका महिलेच्या घरातून उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. वैशाली संजय खेतमाळीस (वय ४८) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार अशोक भागवत गिरी यांनी सरकारतर्फे लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर पोलिस आणि गुन्हे शाखा युनिट ६ चे पथक बुधवारी (दि. १३) परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी माळी मळा परिसरात एका महिलेने घरात मोठ्या प्रमाणावर गुटख्याचा साठा करून विक्री सुरू असल्याची माहिती खबऱ्यामार्फत पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला. घरात प्रवेश करताच पोलिसांना हॉलमध्ये मोठमोठ्या पोत्यांमध्ये आणि बॅगमध्ये भरून ठेवलेला गुटखा आढळला.


डायरेक्टर स्पेशल पान मसाला, विमल पान मसाला, आरएमडी, रजनीगंधा, वी-१ तंबाखू, तुलसी तंबाखू तसेच शॉट प्रीमियम च्युइंग टोबॅको यांसारख्या प्रतिबंधित पदार्थांचा मोठा साठा घरात उघड्यावर ठेवण्यात आला होता. या कारवाईदरम्यान पोलिसांनी एकूण ५ लाख ७ हजार १९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या तंबाखूजन्य पदार्थांची साठवणूक आणि विक्री हा गंभीर गुन्हा मानला जात असतानाही लोणी काळभोर परिसरात खुलेआम काळाबाजार सुरू असल्याचे या कारवाईतून उघड झाले आहे. या प्रकरणी पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करीत आहेत.

---

**९२० एकर जमिनींसाठी शेतकऱ्यांची संमती, ११५ कोटींचे वाटप**

# पुरंदर विमानतळ भूसंपादनाला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून, मोबदल्याचे सूत्र निश्चित झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून संमतीपत्रे देण्यास मोठा प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ९२० एकर जमिनींसाठी शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे संमती दिली असून, गेल्या चार दिवसांत तब्बल ११५ कोटी रुपयांच्या मोबदल्याचे वितरण करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, विमानतळासाठी सात गावांमधील जमीन संपादित केली जाणार असून, पहिल्या टप्प्यात मूळ शेतकऱ्यांनाच मोबदला देण्यात येत आहे. संमती करारनामा पूर्ण होताच संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गुंतवणूकदारांना सध्या कोणताही मोबदला देण्यात आलेला नसल्याचेही त्यांनी नमूद केले. भूसंपादनासाठी बाधित शेतकऱ्यांना प्रतिएकर किमान १ कोटी ६१ लाख रुपयांचा दर निश्चित करण्यात आला आहे. घर, फळबाग, बोअरवेल आणि इतर घटकांचा विचार करता प्रतिएकर सरासरी दोन कोटी रुपयांपर्यंत मोबदला मिळणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संमती देणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत असल्याचे प्रशासनाने सांगितले.

दरम्यान, विमानतळ प्रकल्प रद्द झाल्यास २५ टक्के व्याजासह रक्कम परत घेतली जाईल किंवा काहींना अधिक मोबदला मिळणार असल्याच्या अफवा परिसरात पसरवल्या जात आहेत. या अफवांमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याने संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

जमिनींवर बँकांचे कर्ज अथवा बोजे असल्यास ती रक्कम संबंधित शेतकऱ्यांनाच भरावी लागणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, प्रक्रिया सुलभ करण्यासाठी प्रशासनाकडून बँकांशी समन्वय साधला जात असून, अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनी भूसंपादन अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

---

## घरातून रागावून गेलेला ११ वर्षीय मुलगा सुखरूप सापडला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील डुंबरवाडी येथून दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेला ११ वर्षीय मुलगा ओतूर पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे सुखरूप सापडला आहे. कृष्णा निलेश वामन (वय ११ वर्षे ३ महिने) असे मुलाचे नाव असून, तो रागाच्या भरात घरातून निघून गेल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ मे रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास कृष्णा हा नातेवाईकांच्या घरातून कोणालाही न सांगता बाहेर पडला होता. यानंतर त्याचे वडील निलेश तुकाराम वामन यांनी ओतूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १३४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) अंतर्गत अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच ओतूर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. ओतूर, आळेफाटा, जुन्नर तसेच परिसरातील विविध भागांत शोधमोहीम राबवण्यात आली. याशिवाय परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी करण्यात आली. अखेर बुधवारी सकाळी कृष्णा हा आळेफाटा येथे सुखरूप आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कुटुंबियांच्या स्वाधीन केले.

या प्रकरणाचा तपास जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, पोलीस उपनिरीक्षक संदीप आमणे, पोलीस हवालदार दिनेश साबळे, देविदास खेडकर, जनार्धन सापटे, जोतिराम पवार, योगेश उर्कीडे, मयुरी खोसे आणि आशिष जगताप यांच्या पथकाने केला.

---

## मंचरवर पाणीटंचाईचे सावट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** भीषण उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मंचर शहरावर पाणीटंचाईचे संकट गडद होताना दिसत आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सुलतानपूर येथील जॅकवेलमधील पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटली असून, सध्या केवळ १५ ते २० दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती समोर आली आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत उपनगराध्यक्ष संदीप उर्फ लक्ष्मण थोरात आणि नगरसेवकांनी गुरुवारी सुलतानपूर येथील जॅकवेलला भेट देऊन पाणीपुरवठा व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणीदरम्यान उपनगराध्यक्ष संदीप थोरात यांनी पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत परिस्थितीची माहिती घेतली. जॅकवेलमधील साठा झपाट्याने कमी होत असल्याने शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

यावर अधिकाऱ्यांनी, "सध्याचा साठा संपल्यानंतर तातडीने पाणी सोडण्यात येईल," असे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. प्रशासनाच्या या आश्वासनामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी, पुढील १५ दिवस मंचरकरांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

दरम्यान, मर्यादित पाणीसाठ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा वापर जपून आणि काटकसरीने करावा, असे आवाहन उपनगराध्यक्ष संदीप थोरात आणि नगरसेवकांनी केले आहे. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

पाणी सोडण्यासंदर्भातील तांत्रिक प्रक्रिया आणि नियोजनासाठी नगरपालिका प्रशासन आणि जलसंपदा विभाग यांच्यात समन्वय सुरू असून, वेळेत पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. यावेळी नगरसेवक वसंत बाणखेले, शिवाजी राजगुरू, विकास जाधव, नगरसेविका मालती थोरात, वंदना बाणखेले, नगरसेवक विशाल आवळे तसेच मंचर नगरपंचायतीच्या अधिकारी राजश्री मोरे उपस्थित होत्या.

---

## सिंचनाच्या नियोजनामुळे पाणी कपात?

**पुरेसा साठा असतानाही अतिरिक्त आवर्तनामुळे कपातीची शक्यता**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** खडकवासला धरण प्रकल्पात सध्या पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असतानाही जून-जुलै महिन्यात पुण्यात पाणी कपात करण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जलसंपदा विभागाने केलेल्या नियोजनानुसार ३१ जुलैपर्यंत पुणे शहर आणि ग्रामीण भागाच्या पिण्याच्या गरजांसाठी आवश्यक पाणी राखीव ठेवण्यात आले असून, तरीही धरणात सुमारे २ टीएमसी पाणी शिल्लक राहणार आहे.

जलसंपदा विभागाने ३० एप्रिल रोजी खडकवासला प्रकल्पातील १०.२७ टीएमसी पाणीसाठ्याचे नियोजन केले होते. त्यानुसार पुणे शहरासाठी ४.७ टीएमसी, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी ०.३ टीएमसी आणि सिंचनासाठी २.८ टीएमसी पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. याशिवाय बाष्पीभवनासाठी ०.८२ टीएमसी पाण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

या सर्व नियोजनानंतरही धरणात सुमारे २ टीएमसी पाणी शिल्लक राहणार असल्याचे विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. मात्र, सिंचनासाठी अतिरिक्त पाणी वापरले जाण्याची शक्यता लक्षात घेता पुण्यात पाणी कपातीबाबत चर्चा सुरू झाली आहे. गुरुवारी खडकवासला धरणसाखळीत एकूण ८.४१ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध होता. पुणे शहराला दरवर्षी सुमारे २१ टीएमसी पाण्याची आवश्यकता भासते. त्यापैकी १८ टीएमसी पाणी खडकवासला प्रकल्पातून तर उर्वरित पाणी भामा आसखेड आणि पवना धरणातून पुरवले जाते.

दरम्यान, हवामान विभागाने यंदा सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ऑगस्टअखेरपर्यंत पिण्याच्या पाण्याची तरतूद राखून ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानंतर जलसंपदा विभागाने पुणे महापालिकेला १५ टक्के पाणीकपातीचा प्रस्ताव दिल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. महापालिकेने अलीकडेच एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवला होता. त्यानंतर अनेक भागांमध्ये विस्कळीत पाणीपुरवठा झाला असून टँकरची मागणी वाढल्याचे चित्र दिसून आले. सिंचनासाठी उन्हाळी आवर्तनावरूनही प्रश्न उपस्थित होत आहेत. यंदा १८ फेब्रुवारी ते ११ मेदरम्यान पहिल्या उन्हाळी आवर्तनासाठी तब्बल ६.९७ टीएमसी पाणी वापरण्यात आले. आता दुसऱ्या उन्हाळी आवर्तनासाठी आणखी ३.१० टीएमसी पाणी वापरण्याचे नियोजन आहे. अशाप्रकारे उन्हाळी सिंचनासाठी एकूण १० टीएमसी पाणी खर्च होणार आहे.

गेल्या काही वर्षांत सिंचनासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी वापरण्यात आले नव्हते. त्यामुळे पाऊस लांबल्यास आणि सिंचनासाठी अधिक पाणी सोडल्यास पुणेकरांना जून-जुलैमध्ये पाणी कपातीला सामोरे जावे लागू शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

## लोणीत भरदिवसा सोनसाखळी चोरीचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी :** आंबेगाव तालुक्यातील लोणी येथे भरदिवसा दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. मात्र, संबंधित महिलेने दाखवलेल्या धाडसामुळे चोरीचा प्रयत्न फसला असून सुमारे साडेचार लाख रुपयांचा दागिना चोरीला जाण्यापासून बचावला.

ही घटना बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास बेल्हा-जेजुरी महामार्गावरील लोणी-पाबळ परिसरात घडली. विजया ज्ञानेश्वर गायकवाड (वय ५५) या आपल्या दुकानात बसल्या असताना दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी तंबाखूची पुडी घेण्याच्या बहाण्याने दुकानाजवळ येत त्यांच्या गळ्यातील अडीच तोळ्यांचे सोन्याचे गंठण हिसकावण्याचा प्रयत्न केला.

यावेळी गायकवाड यांनी प्रसंगावधान राखत जोरदार प्रतिकार केला. त्यांनी चोरट्याच्या शर्टची कॉलर पकडल्याने गोंधळ उडाला. आरडाओरडा होताच चोरट्यांनी दागिना तेथेच टाकून दुचाकीवरून पाबळच्या दिशेने पळ काढला. दुसरा साथीदार दुचाकी सुरू अवस्थेत तयारच उभा होता, अशी माहिती मिळाली.

घटनेची माहिती मिळताच पारगाव-कारखाना पोलीस ठाण्याचे बीट अंमलदार दत्ता जठर, पोलीस कर्मचारी संजय साळवे, पोलीस पाटील संदीप आढाव तसेच खडकवाडीचे माजी सरपंच अनिल डोके यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

नागरिकांनी मौल्यवान दागिने परिधान करताना काळजी घ्यावी तसेच एकांतिक ठिकाणी राहणाऱ्यांनी अनोळखी विक्रेते किंवा संशयित व्यक्तींपासून सावध राहावे, असे आवाहन पारगाव-कारखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी केले आहे.

---

## बारामतीत रॉकेलचा थेंबही नाही घोषणेनंतर महिनाभर नागरिक प्रतीक्षेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** ग्रामीण आणि निमशहरी भागात घरगुती गॅस सिलिंडर टंचाईची समस्या गंभीर बनलेली असताना सरकारने रॉकेल वाटपाची घोषणा करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, घोषणा होऊन तब्बल महिना उलटूनही बारामती तालुक्यात प्रत्यक्षात रॉकेलचा एक थेंबही पोहोचलेला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

युद्धजन्य परिस्थितीमुळे मागील महिन्यात गॅस सिलिंडर पुरवठा विस्कळीत झाला होता. पुरवठा कमी आणि मागणी जास्त असल्याने ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना वेळेत गॅस मिळत नसल्याने स्वयंपाकाचे नियोजन कोलमडले. या पार्श्वभूमीवर राज्याचे पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी गॅसला पर्याय म्हणून नागरिकांना रॉकेलचा पुरवठा करण्यात येईल, अशी घोषणा केली होती. मात्र, प्रत्यक्षात अद्याप रॉकेल उपलब्ध झालेले नाही.

सध्या उन्हाळी सुटीमुळे बाहेरगावी असलेले विद्यार्थी, नोकरदार आणि कुटुंबीय गावी परतल्याने गॅसचा वापर वाढला आहे. मात्र, गॅस वितरणातील विलंबामुळे महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासनाच्या रॉकेल वाटपाच्या घोषणेकडे नागरिकांनी आशेने पाहिले होते. परंतु, ती अंमलात न आल्याने नागरिकांचा संताप वाढू लागला आहे. रेशन दुकानदारांच्या म्हणण्यानुसार, शासनाकडून रॉकेल वाटपाचे आदेश मिळाले असले तरी प्रत्यक्ष साठा उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे ग्राहकांच्या प्रश्नांना उत्तरे देताना दुकानदारांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक गावांमध्ये महिलांनी रेशन दुकानांवर गर्दी करून चौकशी केली असता, उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचे समोर आले आहे.

---

## चारा टंचाईमुळे मेंढपाळ आणि गोपालक संकटात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात यंदाच्या तीव्र उन्हाळ्यामुळे चारा टंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली असून धनगर मेंढपाळ तसेच गीर गाईंचे गोपालक मोठ्या आर्थिक आणि नैसर्गिक संकटाचा सामना करत आहेत. नागापूर, रांजणी आणि पारगाव परिसरातील पशुपालकांना जनावरांचा सांभाळ करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे.

हिरवा चारा पूर्णपणे संपुष्टात आल्याने गीर गाईंना मका, ऊस तसेच अन्य विकतचा चारा खाऊ घालण्याची वेळ गोपालकांवर आली आहे. अनेक ठिकाणी केळीचे खूट गोळा करून ते जनावरांना खाऊ घातले जात आहेत. मात्र हा पर्यायी चारा अपुरा ठरत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होत असून दूध उत्पादनात मोठी घट झाल्याचे गोपालकांनी सांगितले.

परिसरात गेल्या काही महिन्यांपासून पावसाचा पूर्ण अभाव असल्याने शेतांतील हिरवा चारा नष्ट झाला आहे. शेतकऱ्यांनी जनावरांसाठी साठवून ठेवलेला चारा देखील आता संपत आल्याने पशुपालकांची चिंता वाढली आहे. दिवसेंदिवस वाढणारा चाऱ्याचा खर्च परवडत नसल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. धनगर मेंढपाळांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मेंढ्या आणि शेळ्यांसाठी चारापाणी शोधण्यासाठी त्यांना उन्हाच्या कडाक्यात दूरवर भटकंती करावी लागत आहे. अनेक ठिकाणी कुटुंबीयांसह स्थलांतर करावे लागत असून लहान मुलांनाही उन्हातच दिवस काढावे लागत आहेत. पशुपालकांनी शासनाने तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अनुदानित चारा उपलब्ध करून द्यावा तसेच पाणीटंचाई निवारणासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

---

**१५ ते २० टक्के अपघात कमी करण्याचे उद्दिष्ट**

# अपघात रोखण्यासाठी ओतूर पोलिसांचा पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळेफाटा :** पुणे ग्रामीण परिसरातील वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर ओतूर पोलिसांनी जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. जिल्ह्यातील अपघातांचे प्रमाण १५ ते २० टक्क्यांनी कमी करण्याच्या उद्देशाने विशेष रोड सेफ्टी अभियान राबवण्यात येत असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत चालक आणि नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी जनजागृतीपर सूचनाफलक लावण्यात येणार आहेत. ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी सांगितले की, अपघातप्रवण क्षेत्रे, तीव्र वळणे, घाटरस्ते, शाळा-महाविद्यालय परिसर तसेच महामार्गांवरील धोकादायक ठिकाणी हे फलक उभारले जाणार आहेत. सूचनाफलकांवर वाहनचालकांना सुरक्षिततेचे संदेश देण्यात येणार असून त्यामध्ये "वेगावर नियंत्रण ठेवा, जीव वाचवा", "हेल्मेट तुमचे सुरक्षा कवच आहे", "सीटबेल्ट लावा, सुरक्षित राहा", "मद्यपान करून वाहन चालवू नका" आणि "मोबाईलवर बोलत वाहन चालवणे टाळा" अशा सूचना समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

याबाबत बोलताना पोलिस प्रशासनाने सांगितले की, केवळ दंडात्मक कारवाई करून अपघात रोखता येणार नाहीत. वाहनचालकांमध्ये स्वयंशिस्त आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. सूचनाफलकांमुळे चालकांना वाहतूक नियमांची सतत आठवण राहण्यास मदत होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला. या मोहिमेमुळे नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता वाढून अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून नागरिकांनीही नियमांचे पालन करून पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## टँकरखाली आल्याने ६३ वर्षीय महिलेचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदीतील मामासाहेब मोहोळ धर्मशाळेसमोर गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एका ६३ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. दुचाकीचा तोल गेल्यानंतर महिला पाण्याच्या टँकरखाली आल्याने टँकरचे चाक त्यांच्या डोक्यावरून गेल्याची घटना घडली. अन्नपूर्णा माणिकराव रोकडे (वय ६३, रा. विकासवाडी, धानोरे फाटा, ता. खेड, जि. पुणे) असे मृत महिलेचे नाव आहे.

आळंदी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास हरिपाठ उद्यानाजवळील गणपती मंदिर चौक परिसरात हा अपघात झाला. चऱ्होली खुर्द रस्त्यावरून जात असताना दुचाकीस्वाराचा अचानक तोल गेला आणि दुचाकी रस्त्यावर घसरली. त्याचवेळी समोरून येणाऱ्या पाण्याच्या टँकरखाली अन्नपूर्णा रोकडे या आल्याने टँकरचे चाक त्यांच्या डोक्यावरून गेले. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. माहिती मिळताच आळंदी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पुढील तपास सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी दिली. आळंदी परिसरातील वाढती वाहतूक, अपूर्ण रस्ते विकासकामे आणि रखडलेले फुटपाथ यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## सारांश वृत्त

### सिलिंडर पुरवठ्याच्या बहाण्याने फसवणूक

**जामतारा:** झारखंडच्या जामतारा जिल्ह्यात स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर पुरवण्याच्या बहाण्याने बँक खात्याचा तपशील मिळवून लोकांची फसवणूक केल्याप्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलीस पथकाने दखनिडीह गावातील बंद असलेल्या प्राथमिक शाळेच्या आवारात छापा टाकून तिघांना अटक केली.

### सिद्धरामय्या यांची दरवाढीवर टीका

**बंगळूर** : कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शुक्रवारी सांगितले की, चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतर अपेक्षेप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ केली आहे. या निर्णयाचा निषेध करत, त्यांनी ही दरवाढ मागे घेण्याची मागणी केली आणि सध्या भाववाढ करण्याची काहीही गरज नसल्याचे सांगितले. "निवडणुकांनंतर ते पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवतील, असे आम्ही सांगत आलो आहोत. जेव्हा आम्ही इतर राज्यांपेक्षा आमचे दर कमी असल्याचे सांगून किंचित दर वाढवले, तेव्हा भाजपने आमच्यावर टीका केली, असे सिद्धरामय्या म्हणाले.


### बनावट कपड्यांच्या रॅकेटचा पर्दाफाश

**नवी दिल्ली** : दिल्ली पोलिसांनी पश्चिम दिल्लीतील नारायणा औद्योगिक परिसरातून चालणाऱ्या बनावट कपडे निर्मिती रॅकेटचा पर्दाफाश केला असून, त्यांच्याकडून ३,४०० हून अधिक बनावट ब्रँडेड जीन्स, बनावट लेबल्स, पॅकेजिंग साहित्य आणि औद्योगिक शिलाई मशीन जप्त केल्या आहेत, अशी माहिती एका अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली. नामांकित आंतरराष्ट्रीय ब्रँडचे लेबल असलेल्या बनावट कपड्यांची निर्मिती आणि साठवणूक होत असल्याची तक्रार मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. सक्षम अधिकाऱ्याकडून परवानगी मिळाल्यानंतर नारायणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## एलपीजी पुरवठ्यासह सामरिक भागीदारीला बळ

# भारत-यूएई यांच्यात ऊर्जा करार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील वाढत्या संघर्ष आणि जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात महत्त्वपूर्ण ऊर्जा करार झाला आहे. दोन्ही देशांनी एलपीजी पुरवठा आणि सामरिक पेट्रोलियम साठ्यांसंदर्भात करारांवर स्वाक्षऱ्या केल्या असून, या निर्णयामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेला मोठा आधार मिळणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

पंतप्रधान मोदी सध्या संयुक्त अरब अमिरातीच्या दौऱ्यावर असून, त्यांनी या भेटीदरम्यान इराणकडून झालेल्या हल्ल्यांचा निषेध करत पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत "सर्वतोपरी सहकार्य" करेल, असे स्पष्ट केले. अबू धाबी येथे झालेल्या चर्चेदरम्यान मोदी म्हणाले की, होर्मुझ सामुद्रधुनीतील सुरळीत सागरी वाहतूक सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. "या प्रदेशात शांतता आणि स्थैर्य राखण्यासाठी जे काही आवश्यक असेल ते करण्यास भारत तयार आहे," असे त्यांनी नमूद केले.

या भेटीदरम्यान भारत आणि यूएईदरम्यान सामरिक संरक्षण भागीदारीसाठीही एक व्यापक आराखडा तयार करण्यात आला. पंतप्रधान मोदी चार तासांच्या अल्पकालीन दौऱ्यासाठी यूएईमध्ये दाखल झाले असून, त्यानंतर ते युरोप दौऱ्यावर रवाना होणार आहेत. दोन्ही देशांदरम्यान झालेल्या करारानुसार, भारताच्या सामरिक पेट्रोलियम साठ्यांबाबत सहकार्य वाढवले जाणार आहे. तसेच स्वयंपाकाच्या गॅसच्या म्हणजेच एलपीजीच्या दीर्घकालीन पुरवठ्यासाठीही करार करण्यात आला आहे. यूएईने भारतातील पायाभूत सुविधा आणि बँकिंग क्षेत्रात मोठ्या गुंतवणुकीची घोषणा केली असून, सुमारे ५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सोशल मीडिया पोस्टमध्ये मोदी यांनी यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाहयान यांचे स्वागताबद्दल आभार मानले. "ऊर्जा, गुंतवणूक, पुरवठा साखळी आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये भारत-यूएई संबंध अधिक मजबूत करण्यासाठी होणाऱ्या चर्चेबाबत मी उत्सुक आहे," असे मोदी यांनी म्हटले.

दरम्यान, ओमानच्या किनाऱ्याजवळ भारतीय ध्वज असलेल्या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याचा यूएईने तीव्र निषेध केला आहे. यूएईने या घटनेला "दहशतवादी हल्ला" संबोधत आंतरराष्ट्रीय सागरी सुरक्षेला गंभीर धोका असल्याचे म्हटले. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, सोमालियाहून निघालेल्या भारतीय व्यापारी जहाजावर बुधवारी हल्ला झाला. जहाजावरील सर्व १४ कर्मचाऱ्यांची ओमान प्रशासनाने सुखरूप सुटका केली.

यूएईच्या परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, "ओमानच्या किनाऱ्याजवळ भारतीय जहाजावर झालेला दहशतवादी हल्ला आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करणारा आहे."

ही घटना होर्मुझ सामुद्रधुनीजवळ घडली. जगातील जवळपास २० टक्के ऊर्जा पुरवठा या अरुंद सागरी मार्गातून होतो. त्यामुळे या भागातील तणावाचा थेट परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर होत आहे.

## नीट-यूजी २०२६ फेरपरीक्षा २१ जूनला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए) ने नीट-यूजी २०२६ परीक्षेची फेरपरीक्षा येत्या २१ जून रोजी घेण्यात येणार असल्याची घोषणा शुक्रवारी केली. पेपरफुटी आणि इतर अनियमिततांच्या आरोपांमुळे मूळ परीक्षा रद्द करण्यात आल्यानंतर काही दिवसांनी हा निर्णय जाहीर करण्यात आला.

एनटीएने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमध्ये सांगितले की, हा निर्णय भारत सरकारच्या मान्यतेनंतर घेण्यात आला आहे. तसेच परीक्षेसंबंधित माहिती मिळवताना उमेदवार आणि पालकांनी केवळ अधिकृत माध्यमांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहनही संस्थेने केले.

"भारत सरकारच्या मान्यतेने राष्ट्रीय चाचणी संस्थेने नीट (यूजी) २०२६ ची फेरपरीक्षा रविवार, २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे," असे एनटीएने स्पष्ट केले. फेरपरीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाल्याने प्रवेशपत्रे परीक्षेच्या चार ते पाच दिवस आधी उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एनटीएने यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, फेरपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. ३ मे रोजी झालेल्या मूळ परीक्षेसाठी नोंदणी केलेले सर्व उमेदवार कोणतेही नवीन शुल्क न भरता २१ जूनच्या परीक्षेला बसू शकतील.

देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ३ मे रोजी नीट-यूजी २०२६ परीक्षा घेण्यात आली होती. मात्र, प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांसह विविध अनियमिततांची प्रकरणे समोर आल्यानंतर परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. यानंतर केंद्र सरकारच्या मान्यतेने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. एनटीएने सांगितले की, केंद्रीय संस्थांकडून मिळालेली माहिती, तपास यंत्रणांचे निष्कर्ष आणि प्रणालीतील पारदर्शकता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली.

## भारत दीर्घकालीन मध्यस्थ ठरू शकतो

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी भारताच्या राजनैतिक क्षमतेचे कौतुक करत इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या संघर्षात भारत दीर्घकालीन मध्यस्थाची भूमिका बजावू शकतो, असे मत व्यक्त केले. भारताचा "विस्तृत राजनैतिक अनुभव आणि आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा" लक्षात घेता, पश्चिम आशियातील स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी नवी दिल्ली महत्त्वाची भूमिका निभावू शकते, असे त्यांनी म्हटले.

ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीनंतर शुक्रवारी आयोजित



पत्रकार परिषदेत लावरोव्ह बोलत होते. यावेळी त्यांनी इराण आणि अमेरिका यांच्यात तातडीने संवाद घडवून आणण्यासाठी पाकिस्तान प्रयत्न करत असल्याचा उल्लेख केला, मात्र दीर्घकालीन प्रादेशिक स्थैर्यासाठी भारत अधिक व्यापक आणि प्रभावी भूमिका बजावू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

"तात्काळ प्रश्न सोडवण्यासाठी पाकिस्तान अमेरिका आणि इराण यांच्यात संवाद प्रस्थापित करण्यास मदत करत आहे. मात्र, जर इराण आणि त्याच्या अरब मित्र राष्ट्रांमध्ये दीर्घकालीन मध्यस्थाची गरज भासली, तर भारत त्याच्या व्यापक राजनैतिक अनुभवाच्या बळावर ही भूमिका निभावू शकतो," असे लावरोव्ह म्हणाले.


पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे जागतिक पातळीवर चिंता व्यक्त होत असताना, रशियन आणि इराणी तेलावरील अमेरिकेच्या निर्बंधांमधील सवलतींची मुदत संपण्याच्या पार्श्वभूमीवरही लावरोव्ह यांचे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे.

## पेट्रोल-डिझेल दरवाढीवरून हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीच्या निर्णयावरून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ने शुक्रवारी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. या दरवाढीमुळे महागाई आणखी वाढेल, आर्थिक विकासदराचे अंदाज घसरणार असून सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडेल, असा आरोप काँग्रेसने केला.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्या होत्या. त्या काळात इंधनदर कमी करून त्याचा फायदा ग्राहकांना मिळायला



हवा होता, अशी काँग्रेसची सातत्याने मागणी होती. मात्र, केंद्र सरकारने उलट ग्राहकांची "फसवणूक" केल्याचा आरोप त्यांनी केला.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमध्ये रमेश यांनी म्हटले की, पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय तेलाच्या किमती वाढत आहेत. विधानसभा निवडणुका संपल्यानंतर मोदी सरकारने आधी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचे दर वाढवले आणि आता पेट्रोल-डिझेलच्या दरातही वाढ केली आहे. "या निर्णयामुळे महागाई वाढणार हे निश्चित आहे. चालू आर्थिक वर्षात महागाई दर सुमारे ६ टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता असून आर्थिक विकासाचे अंदाजही मोठ्या प्रमाणात कमी करावे लागतील," असा दावा त्यांनी केला.

दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही केंद्र सरकारवर कठोर टीका केली. सरकारच्या "नेतृत्व संकट, दूरदृष्टीच्या अभाव आणि अकार्यक्षमतेमुळे" देश आर्थिक संकटाच्या दिशेने जात असल्याचा आरोप त्यांनी केला. एक्सवरील पोस्टमध्ये खर्गे म्हणाले, "हे संकट सरकारने स्वतः निर्माण केले आहे आणि त्याची किंमत देशातील जनता पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या वाढत्या दरांमधून मोजत आहे." ते म्हणाले की, डिझेलचे दर वाढले की त्याचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर होतो आणि त्यातून वस्तूंच्या किमती वाढून महागाईची साखळी निर्माण होते. उद्योग, शेतकरी, व्यापारी आणि घरगुती अर्थकारण या सर्वांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## अरवलीतील खाणकामावर 'सर्वोच्च' नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालय ने अरवली पर्वतरांगांतील खाणकामासंदर्भातील वाढत्या पर्यावरणीय चिंतेची गंभीर दखल घेत शुक्रवारी खाणपट्टेधारकांना कोणताही तातडीचा दिलासा देण्यास नकार दिला. अरवली परिसरातील परिस्थितीबाबत मिळत असलेला प्रतिसाद "अत्यंत चिंताजनक" असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले की, संपूर्ण समाधान होईपर्यंत कोणत्याही प्रकारच्या खाणकामास परवानगी दिली जाणार नाही.

"आम्ही हे प्रकरण तुकड्या-तुकड्याने ऐकणार नाही. जोपर्यंत आम्हाला पूर्ण समाधान होत नाही, तोपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यास परवानगी दिली जाणार नाही," असे खंडपीठाने स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालय सध्या 'अरवली डोंगर आणि पर्वतरांगांची व्याख्या आणि संबंधित मुद्दे' या स्वयंप्रेरित जनहित याचिकेची सुनावणी करत आहे. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी नमूद केले की, "तेथे अनेक गोष्टी घडत आहेत. आम्हाला जे प्रतिसाद मिळत आहेत ते अत्यंत चिंताजनक आहेत."

एका वकिलाने खाणपट्टेधारकांच्या वतीने प्रकरण मांडल्यानंतर खंडपीठाने स्पष्ट केले की, एखादा खाणकाम परवाना रद्द झाल्यास संबंधित पक्षाला कायदेशीर आव्हान देण्याचा अधिकार असेल. मात्र, सध्या न्यायालय खाणपट्टेधारकांच्या बाजूने कोणताही आदेश देणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले. "हे अत्यंत संवेदनशील प्रकरण आहे," असे खंडपीठाने नमूद केले.

## मुस्लिम पक्षाचा दावा फेटाळला

# भोजशाळा संकुल हे सरस्वती मंदिरच

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**इंदौर** : मध्य प्रदेश उच्च न्यायालय ने शुक्रवारी धार येथील ऐतिहासिक भोजशाळा मंदिर-कमल मौला मशीद वादात महत्त्वपूर्ण निर्णय देत भोजशाळा संकुलाचे धार्मिक स्वरूप देवी सरस्वतीला समर्पित मंदिराचे असल्याचे मान्य केले. न्यायालयाने कमल मौला मशिदीवरील मुस्लिम पक्षाचा दावा फेटाळून लावत मशिदीसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारवर सोपवला.

न्यायमूर्ती विजय कुमार शुक्ला आणि आलोक अवस्थी यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, "या वास्तूचे धार्मिक स्वरूप मंदिराचे आहे आणि मुस्लिम समाज मशिदीसाठी पर्यायी जागेसाठी अर्ज करू शकतो."

खंडपीठाने नमूद केले की, वादग्रस्त भोजशाळा संकुल आणि कमल मौला मशीद ही संरक्षित स्मारके आहेत. मात्र, उपलब्ध पुरावे, ऐतिहासिक नोंदी आणि सर्वेक्षण अहवालांच्या आधारे या संकुलाचे मूलभूत धार्मिक स्वरूप वाग्देवी सरस्वती मंदिराचे असल्याचे स्पष्ट होते. न्यायालयाने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) चा २००३ मधील आदेशही रद्द केला. या आदेशानुसार हिंदूंना मर्यादित पूजा करण्याची परवानगी होती, तर मुस्लिम समाजाला ठराविक वेळी नमाज अदा करण्याची मुभा देण्यात आली होती. न्यायालयाने म्हटले की, त्या आदेशामुळे हिंदूंच्या पूजा-अर्चनेच्या अधिकारांवर निर्बंध आले होते. इंदौर खंडपीठाने या प्रकरणाशी संबंधित पाच याचिका आणि एका रिट अपीलवर ६ एप्रिलपासून नियमित सुनावणी सुरू केली होती. सर्व पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने १२ मे रोजी निर्णय राखून ठेवला होता.

भोजशाळा हे स्थळ हिंदू समाजाकडून देवी सरस्वतीचे प्राचीन मंदिर मानले जाते. दुसरीकडे मुस्लिम पक्षाने हा परिसर कमल मौला मशीद असल्याचा दावा केला होता. तसेच एका जैन याचिकाकर्त्याने या संकुलात मध्ययुगीन जैन मंदिर आणि गुरुकुल अस्तित्वात असल्याचे न्यायालयात सांगितले. या वादात विविध धार्मिक दावे, ऐतिहासिक संदर्भ, कायदेशीर तरतुदी आणि हजारो दस्तऐवजांचा आधार घेण्यात आला.

एएसआयने न्यायालयात सादर केलेल्या २,००० पानांहून अधिकच्या वैज्ञानिक सर्वेक्षण अहवालात दावा केला होता की, मशिदीपूर्वी या ठिकाणी परमार राजांच्या काळातील भव्य वास्तू अस्तित्वात होती.

सध्याची वादग्रस्त रचना मंदिरातील वास्तुशिल्पीय घटकांचा पुनर्वापर करून उभारण्यात आल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले.

## विमान भाड्यांमध्ये सुसूत्रता आवश्यक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालय ने विमान कंपन्यांकडून आकारल्या जाणाऱ्या तिकीट दरांतील मोठ्या तफावतीबाबत गंभीर चिंता व्यक्त करत शुक्रवारी केंद्र सरकारला हवाई प्रवाशांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजनांचा विचार करण्याचे निर्देश दिले. विमान भाड्यांमध्ये काही प्रमाणात "सुसूत्रता" आणण्याची गरज असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने निदर्शनास आणून दिले की, एकाच दिवशी आणि एकाच मार्गावर प्रवासासाठी वेगवेगळ्या विमान कंपन्यांकडून प्रचंड भिन्न दर आकारले जात आहेत.

"एकाच दिवशी, एकाच मार्गावरील विमानप्रवासासाठी एक एअरलाइन इकॉनॉमी क्लासचे तिकीट ८,००० रुपयांत देते, तर दुसरी एअरलाइन त्याच मार्गासाठी १८,००० रुपये आकारते. या तफावतीमुळे सामान्य प्रवाशांना काहीसा दिलासा मिळावा यासाठी प्रयत्न करा," असे खंडपीठाने केंद्र सरकारतर्फे उपस्थित सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना सांगितले. यावर तुषार मेहता यांनी न्यायालयाला माहिती दिली की, २०२४ चा नवीन भारतीय वायुयान कायदा लागू झाला असून त्याअंतर्गत नवीन नियमावली तयार करण्याबाबत चर्चा सुरू आहे. त्यानंतर न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी, "विमान भाड्यांमध्ये काही प्रमाणात सुसूत्रता असणे आवश्यक आहे," असे निरीक्षण नोंदवले.

सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, केंद्र सरकार या समस्येचे गांभीर्य मान्य करत असून, कोणताही संघर्ष न वाढवता सर्व बाजूंनी विचार करून तोडगा काढण्याचा प्रयत्न करत आहे.

ही सुनावणी सामाजिक कार्यकर्ते एस. लक्ष्मीनारायणन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुरू होती. याचिकेत नागरी विमान वाहतूक क्षेत्रात पारदर्शकता आणि प्रवासी संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी स्वतंत्र आणि सक्षम नियामक संस्था स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. कंपन्यांकडून आकारल्या जाणाऱ्या मनमानीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियामक मार्गदर्शक तत्त्वांची मागणी करण्यात आली आहे.

### मान्सून २६ मे रोजी केरळमध्ये

**नवी दिल्ली** : नैऋत्य मोसमी पाऊस २६ मे रोजी केरळमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामान विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे. आयएमडीने पुढे सांगितले की, रोगाची सुरुवात अंदाजित तारखेच्या दोन्ही बाजूंनी चार दिवसांनी पुढे-मागे होऊ शकते. केरळमध्ये साधारणपणे १ जूनच्या सुमारास नैऋत्य मोसमी पावसाचे आगमन होते, त्यानंतर तो देशभरात उत्तरेकडे सरकतो, ज्यामुळे जून ते सप्टेंबर या मोसमी पावसाळ्याची सुरुवात होते.

## राहुल गांधींचा मोदींवर निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राहुल गांधी यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका करत, अलीकडील भारत-अमेरिका व्यापार चर्चा या द्विपक्षीय व्यापारी संबंध मजबूत करण्यासाठी नव्हत्या, तर उद्योगपती गौतम अदानी यांना दिलासा मिळवून देण्यासाठीच झाल्या असल्याचा गंभीर आरोप केला.

अमेरिकन अधिकाऱ्यांनी कथित लाचखोरी प्रकरणातील अदानींवरील आरोप मागे घेण्यास सहमती दर्शवल्याच्या वृत्तांनंतर राहुल गांधी यांनी ही प्रतिक्रिया दिली.

दरम्यान, काँग्रेसनेही केंद्र सरकारवर हल्लाबोल करत, "पूर्णपणे एकतर्फी" भारत-अमेरिका व्यापार करार आणि "ऑपरेशन सिंदूर" अचानक थांबवण्यामागील कारणे आता स्पष्ट होत असल्याचा दावा केला.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी म्हटले की, "पंतप्रधानांनी भारत-अमेरिका व्यापार 'करारा'ला मान्यता का दिली, जो प्रत्यक्षात अमेरिकेने भारतावर लादलेला मोठा व्यवहार होता, हे आता स्पष्ट झाले आहे." रमेश यांनी दावा केला की, "राष्ट्रहितापेक्षा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाला झुकून १० मे २०२५ रोजी 'ऑपरेशन सिंदूर' अचानक थांबवण्यात आले. माहितीनुसार, ट्रम्प प्रशासन 'मोडानीं'वरील भ्रष्टाचाराचे सर्व आरोप मागे घेणार आहे," असे रमेश यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले. "मोडानी" हा शब्द वापरत त्यांनी मोदी आणि अदानी यांच्यातील कथित जवळीक अधोरेखित केली आहे.

## अमेरिका-इराण संघर्षाचा भारतावर परिणाम

# कच्च्या तेलाच्या साठ्यात १५ टक्क्यांची घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : अमेरिका-इराण संघर्ष आणि होर्मुझ सामुद्रधुनी अनिश्चित काळासाठी बंद राहिल्यामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर गंभीर परिणाम दिसू लागले आहेत. फेब्रुवारीच्या अखेरीपासून सुरू असलेल्या संघर्षानंतर भारताच्या कच्च्या तेलाच्या साठ्यात जवळपास १५ टक्क्यांची घट झाल्याचे समोर आले आहे.

कमोडिटी विश्लेषण कंपनी केप्लर च्या अहवालानुसार, तेल आयातीत घट झाली असली तरी भारतीय रिफायनऱ्या आतापर्यंत नियमितपणे कार्यरत राहिल्या आहेत. परिणामी, विद्यमान साठ्याचा वेगाने वापर होत असून राखीव तेलसाठा झपाट्याने कमी होत आहे.

तज्ज्ञांच्या मते, पुरवठ्यातील अडथळे दीर्घकाळ कायम राहिल्यास तेल शुद्धीकरण कंपन्यांना उत्पादन कमी करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधन बचतीचे आवाहन केल्याचे मानले जात आहे.

केप्लरच्या रिफायनिंग विभागाचे प्रमुख विश्लेषक निखिल दुबे यांनी सांगितले की, गेल्या अडीच महिन्यांत भारताची कच्च्या तेलाची आयात सरासरी ४.५ दशलक्ष बॅरल प्रतिदिन इतकी राहिली आहे. संघर्षापूर्वी ही आयात जवळपास ५ दशलक्ष बॅरल प्रतिदिन होती. त्यांच्या मते, आयातीत झालेली घट भरून काढण्यासाठी रिफायनऱ्या सध्या विद्यमान साठ्यावर अवलंबून आहेत. मात्र, होर्मुझ सामुद्रधुनी लवकर खुली होण्याची शक्यता कमी असून, भारत कायमस्वरूपी राखीव साठ्यावर अवलंबून राहू शकत नाही, असा इशाराही त्यांनी दिला. केप्लरच्या अहवालानुसार, फेब्रुवारी अखेरीस भारताकडे १०७ दशलक्ष बॅरल कच्च्या तेलाचा साठा होता. तो आता ९१ दशलक्ष बॅरलवर आला आहे. या आकडेवारीमध्ये सामरिक पेट्रोलियम साठा (एसपीआर), रिफायनरी साठे आणि व्यावसायिक साठवणूक यांचा समावेश आहे. भारताचा दररोजचा तेल वापर सुमारे ५ दशलक्ष बॅरल असल्याने, हा साठा केवळ १८ दिवसांसाठी पुरेसा असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, केंद्र सरकारने सोमवारी स्पष्ट केले की, देशाकडे प्रत्यक्षात ६० दिवसांचा तेलसाठा उपलब्ध आहे. सरकारी अधिकाऱ्यांनुसार या गणनेत पाइपलाइनमधील तेल तसेच भारताकडे येणाऱ्या जहाजांमधील साठ्याचाही समावेश करण्यात आला आहे. या संदर्भात अधिकृत माहिती देताना सुजाता शर्मा यांनी सांगितले की, सरकारी आकडेवारी ही व्यापक पुरवठा साखळी लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहे.

एप्रिलमध्ये नायरा एनर्जी च्या गुजरातमधील ४ लाख बॅरल प्रतिदिन क्षमतेच्या रिफायनरीमध्ये देखभाल-दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यामुळे काही प्रमाणात तेल वापर कमी झाला. अन्यथा साठ्यातील घट आणखी वेगाने झाली असती, असे तज्ज्ञांचे मत आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे आखाती देशांचे तेल उत्पादन युद्धपूर्व पातळीच्या तुलनेत १४.४ दशलक्ष बॅरल प्रतिदिनने घटले आहे. एप्रिलमध्ये जागतिक तेलपुरवठा आणखी १.८ दशलक्ष बॅरल प्रतिदिनने कमी होऊन ९५.१ दशलक्ष बॅरल प्रतिदिनवर आला. फेब्रुवारीपासून आतापर्यंत जागतिक पुरवठ्यात एकूण १२.८ दशलक्ष बॅरल प्रतिदिनची घट नोंदवण्यात आली आहे.